CIDCO WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. १२.०३.२०१९**

**प्रकल्पबधित गावांतील महिलांनी निर्मिलेल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री**

**जागतिक महिला दिनानिमित्त 'सिडको तारा' केंद्राचा उपक्रम**

सिडको तारा कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रातर्फे **दि. ८ मार्च, २०१९** रोजी जागतिक महिला दिनानिमित्त नवी मुंबई क्षेत्रातील प्रकल्पबधित महिलांनी निर्मिलेल्या विविध वस्तु आणि उत्पादनांचे प्रदर्शन व विक्रीचे आयोजन **सकाळी १०.०० ते सायं. ०६.००** या वेळेत  सीबीडी बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, टॉवर क्र. २, प्लॅटफॉर्म स्तर येथे करण्यात आले होते. सदर प्रदर्शनास नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

सिडकोच्या सामाजिक उत्तरदायित्वाचा भाग म्हणून सिडको तारा केंद्रामार्फत नवी मुंबईतील प्रकल्पाबाधित गावांतील महिला तसेच तरुण-तरुणींसाठी वेळोवेळी रोजगार व व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांचे/प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येते. विशेषतः, महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनावे याकरिता त्यांना विविध गृहोपयोगी व दैनंदिन वापराच्या  वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात येते.

या प्रदर्शनात विविध प्रकारचे मसाले, भाजणीच्या चकल्या, मेथीचे लाडू, शंकरपाळ्या, पुरणपोळी इ. खाद्यपदार्थ तसेच इमिटेशन ज्वेलरी, पर्यावरणपूरक पेपर बॅग विक्रीकरीता ठेवण्यात आले होते. या प्रदर्शनास साधारणतः ४०० ग्राहकांनी भेट दिली. प्रदर्शानातील वस्तूंच्या विक्रीद्वारे केवळ काही तासांत रु. ३३,१००/- इतके उच्चांकी उत्पन्न मिळाले.

'सिडको तारा' कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रामार्फत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामुळे आपल्यातील उद्यमशीलता वाढीस लागण्याबरोबरच अर्थार्जनामुळे आत्मविश्वासही वृद्धिंगत झाल्याची भावना यावेळी प्रकल्पबाधित महिलांनी व्यक्त केली.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**